**निर्लेखित वाहनांऐवजी नवीन वाहन खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : वाहन-१२२५/प्र.क्र.४५७ (ई-१४८६९२९)/आस्था-५**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ मे, २०२६

**वाचा :-**

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहन-१०००/प्र.क्र.६५/२००१/विनियम, दि.१०.०९.२००१

२) महसूल वन विभाग, शासन निर्णय, क्र.जपीएस २००७/प्र.क्र.२१६/ई-६ दिनांक २०.०६.२०१२

३) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ व क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४ दि.२४.०८.२०१४

४) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम भाग-२ दिनांक १७.०४.२०१५

५) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.वाहन २०२५/प्र.क्र.१९/विनियम दिनांक १७.०९.२०२५

६) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचे पत्र क्र.लेखा-३/शा.वा.खरेदी/२०२५/ E-२४४६११९/१४० दि.२५.०३.२०२६

७) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचे पत्र क्र.लेखा-३/शा.वा.खरेदी/२०२५/ E-२७२३१८२ दि.२५.०३.२०२६

८) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचे आदेश क्र. आस्था / शा. वा. निर्लेखन /२०२५/७९६ वांद्रे दि.०६.०३.२०२५

९) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचे आदेश क्र.लेखा-३/ शा. वा. क्र. MH १२ AH ९९१९/निर्लेखन/२०२६ दि.१७.०२.२०२६

**प्रस्तावना :-**

महसूल व वन विभागाच्या अधिनस्त भूमि अभिलेख विभागातील कार्यालयांच्या आस्थापनेवरील वाहनांचा आढावा झालेला असून विभागाच्या उक्त वाचा मधील अनुक्रमांक २ येथील दि.२० जून,२०१२ च्या शासन निर्णयान्वये भूमि अभिलेख विभागास एकूण ५२ वाहने (१९ कार + ३३ जीप) अनुज्ञेय आहेत.

वित्त विभागाच्या उक्त वाचा मधील अनुक्रमांक १ येथील दि.१० सप्टेंबर,२००१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय व इतर कार्यालयांसाठी वाहनांच्या वापरासंबंधी धोरण विहित करण्यात आले आहे. तसेच, वित्त विभागाच्या वाचा मधील अनुक्रमांक ५ येथील दि. १७ सप्टेंबर,२०२५ च्या शासन निर्णयाान्वये शासकीय वाहनांचे सुधारित किंमत मर्यादा धोरण निश्चित करण्यात आले आहे.

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर व उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे यांचे उक्त वाचा मधील अनुक्रमांक ८ व ९ येथील कार्यालयीन आदेशान्वये खाली नमूद वाहन निर्लेखित करण्यात आलेले आहे :-

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | मंजूर वाहन संख्या | निर्लेखित वाहन क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर | १ | टाटा सुमो ,जीप एम.एच १२.ए एच ९७०१ |
| २. | उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे | १ | टोयोटा इटीओस, कार एम.एच.१२ ए एच ९९१९ |

**२.** निर्लेखित केलेल्या वाहनाच्या बदली जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर व उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे यांचे करिता नवीन वाहन खरेदी करण्यास जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे कार्यालयाकडून वाचा मधील अनुक्रमांक ७ येथील पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. त्यानुसार निर्लेखित केलेल्या २ वाहनाऐवजी १ नवीन जीप व १ नवीन कार खरेदी करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर व उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे यांचे करिता रु.१२ लाख पर्यंत किंमत मर्यादा असलेली १ जीप व १ कार ( वस्तू व सेवा कर+मोटार वाहन कर+नोंदणी शुल्क + सहाय्यभूत साहित्य इत्यादी वगळून ) निधी उपलब्धतेच्या व विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन निर्लेखित वाहनाच्या बदली नवीन वाहन खरेदी करण्याच्या अटीअधीन खरेदीस, राज्यस्तरीय आढावा समितीने मान्यता दर्शविलेली आहे. त्यानुसार १ नवीन जीप व कार खरेदी करण्यास व त्याप्रित्यर्थ रु.२४ लाख (अक्षरी रुपये चोवीस लाख फक्त) (वस्तू व सेवा कर+मोटार वाहन कर+नोंदणी शुल्क + सहाय्यभूत साहित्य इत्यादी वगळून ) इतका निधी खर्च करण्यास खालील अटीच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १७.०९.२०२५ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित अधिकारी यांना अनुज्ञेय किंमतीच्या मर्यादेत (वस्तू व सेवा कर+मोटार वाहन कर+नोंदणी शुल्क + सहाय्यभूत साहित्य इत्यादी वगळून) नवीन वाहन खरेदी करण्यात यावे.

२. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ व क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दिनांक २४.०८.२०१७ च्या शासन निर्णयानुसार वाहन खरेदी Gem Portal वरुन विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.

३. निर्लेखित केलेल्या वाहनांचा विभागाच्या वाहन आढाव्यात समावेश आहे, याची खातरजमा नवीन वाहन खरेदी करण्यापूर्वी करणे आवश्यक राहील.

४. निर्लेखित केलेल्या वाहनाच्या बदली यापूर्वी नवीन वाहन खरेदी करण्यात आले नाही, याबाबतचे प्रमाणपत्र वाहनाच्या खरेदीपूर्वी उपलब्ध करुन देण्यात यावे.

५. नवीन वाहन खरेदीनंतर जुन्या वाहनांची नोंद महाराष्ट्र शासनाच्या महावाहन संगणक प्रणालीवरुन नष्ट करुन नवीन वाहनांची नोंद त्या ठिकाणी घेण्यात यावी.

६. सदर वाहनांच्या खरेदीसाठी येणार खर्च सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षामध्ये संबंधित कार्यालयाने १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

**२.** सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग पहिला,उप विभाग-३, अनु.क्र.३, परिच्छेद १६६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.१७.०९.२०२५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**३.** त्यानुसार "मागणी क्र.सी-१, २०२९-जमीन महसूल १०२ (००) (०१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांची आस्थापना (२०२९ ०३४२) या लेखाशिर्षांतर्गत (१३) कार्यालयीन खर्च" या उद्दीष्टाखाली रु.२४.०० लाख (अक्षरी रुपये चोवीस लाख फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यात येत आहे. सदरचा निधी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात खर्ची करण्यात यावा. सदर निधी नवीन वाहन खरेदी करण्याच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येईल, याची दक्षता घ्यावी. तसेच वाहने खरेदी करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५१५१५०८२१३३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=F0B627B3230194FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E89366B, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2026.05.15 15:10:27 +05'30'

**(अश्विनी यमगर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**:-
१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२. मुंबई/नागपूर
३) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
४) कक्ष अधिकारी (कार्या./ ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४००० ३२.
५) निवड नस्ती ( आस्था-५)